# File No.23-1621/10 (WRO), Dated 21st September, 2010

## Submission of Annual / Final Report of the work done on the Minor Research Project entitled

# "Social-Economical Condition of Matang Community in Nagpur"


## Researcher

## Dr. Ashok Kamble

**Associate Professor**
**(Commerce Department)**

## Kamla Nehru Mahavidhyala, Sakkardar, Nagpur

# "नागपूर शहरातील मातंग समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे अध्ययनाचा संक्षिप्त अहवाल"

**"नागपूर मधील मातंग समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन"** हा विषय संशोधनासाठी निवडतांना डोळ्यासमोर महाराष्ट्रातील संपूर्ण मातंग समाज हा होता. परंतु संशोधनकर्त्याच्या काही अडचणीमुळे संशोधनकर्त्याने या विषयाला फक्त नागपूर शहरापुरते मर्यादित केले आणि म्हणून "नागपूरमध्ये मातंग समाजाच्या आर्थिक परिस्थिती व सामाजिक आणि विश्लेषणात्मक अध्ययन" एवढाच हा विषय मर्यादीत घेवून संशोधनकर्त्याने संशोधनाला सुरुवात केली.

नागपूर शहरात किंवा तालुका किंवा गाव पातळीवर बॅन्ड पार्टीचे दुकाने टाकून हा व्यवहाय चालवितात. या बॅन्ड व्यवसायामध्ये बॅन्ड वाजविण्याकरीता इतर शहरातील किंवा ग्रामीण भागातील बॅन्ड कलाकार येतात. ऑक्टोंबर ते जुलै महिन्यामध्ये हा व्यवसाय चालतो. लग्नाचा हंगाम संपल्यानंतर आपल्या गावाकडे निघुन जातात किंवा इतर जोडधंदे करण्याकरीता ते स्थायिक झालेले दिसून येतात. बॅन्ड व्यवसायाव्यतिरिक्त मातंग समाजातील व्यक्ती झाडू बांधणे व विकणे, टोपले विणने व विकणे, ॲल्युमिनिअमचे  भांडे विकणे व रिक्षा चालविणे अशा प्रकारचे धंदे करतांना आढळतात. ह्या जोडधंदयांना नागपूर जिल्हयात प्रोत्साहन मिळत असल्यामुळे मातंग समाज नागपूर व नागपूर जिल्ह्यात स्थायिक झालेला आढळतो. नागपूर जिल्ह्यात अनुसूचीत जातीतील बौद्ध, चांभार, भंगी, मांग वसलेले आहेत. नागपूर जिल्ह्यात 2001 च्या जनगणनेनुसार मातंग समाजाची एकूण लोकसंख्या 32,129 आहे. त्यात पुरुष 16,302 व स्त्रिया 15,827 आहे.

**नागपूर शहरातील मातंग समाजाच्या वसाहती :-**

नागपूर शहराची 5 भागामध्ये विभागणी केली असता पुढीलप्रमाणे वस्त्याचे विभागानुसार वर्गीकरण करता येईल. (1) पूर्व नागपूर (2) पश्चिम नागपूर (3) उत्तर नागपूर (4) दक्षिण नागपूर (5) मध्य नागपूर.

**मातंग समाजाचे राहणीमान :-**

नागपूर शहरामध्ये मातंग समाजाची घरे शहरी भागात जुन्या वस्तीत आणि झोपडपट्टयात आहेत. तर काहींनी प्लॉट घेवून विटा-सिमेंटची पक्की घरे बांधलेली आहेत. जून्या वस्तीत आणि झोपडपट्टयातील घरे दगडामातीची आढळून येते. ज्या काही कुटुंबाची किंवा व्यक्तीची आर्थिक मिळकत बऱ्यापैकी आहेत किंवा जे व्यक्ती नोकरीला आहेत, बॅन्ड व्यवसाय करणारे किंवा छोटे-मोठे उद्योगधंदे करणारे जे आहेत त्यांचे राहणीमान इतर समाजाच्या तुलनेत बरोबरीचे आहेत. परंतु जे लोक ग्रामीण भागात राहतात, तसेच झोपडपट्टीत किंवा जुन्या वस्तीमध्ये तसेच तहसील व ग्रामीण भागात राहून फड्यांचा, सुप टोपल्यांचा व्यवसाय करणारे आहेत. त्याचप्रमाणे जुन्या कपड्यांचा व्यवसाय करणारे, जर्मन भांड्याचा व्यवसाय करणारे जे लोक आहेत त्यांच्या राहणीमानात किंचित परिवर्तन झाल्याचे आढळून आले. आर्थिक परिस्थितीचा अजूनही त्यांच्या राहणीमानावर परिणाम झाल्याचे दिसून येते.

**विषय निवडण्याची कारणे (उद्दिष्टे) :-**

विषय संशोधनाच्या संबंधातून खालील प्रकारची उद्दिष्टये किंवा कारणे विचारात घेण्यात आली आहे.

(1) मातंग या नावाच्या इतिहासाचा शोध घेणे

(2) नागपूर जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, अंध्दश्रध्दा, रुढी, परंपरा, धार्मिक परिस्थिती व त्याचा मातंग समाजावर व बॅन्ड कलाकारावर झालेला परिणाम याचा शोध घेणे.

(3) नागपूर जिल्ह्यातील मातंग समाजाचे राहणीमान, चालीरिती, भाषा इत्यादी बाबत संशोधन करणे.

(4) मातंग समाजाचा विकासात्मक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

(5) मातंग समाजातील सामाजिक स्थिती अभ्यासणे.

(6) मातंग समाजातील पारंपारिक उद्योगधंदे व इतर व्यवसायाचे विश्लेषणात्मक विवेचन करणे.

(7) मातंग समाजाचे आर्थिक स्थितीचे विवेचन करणे.

(8) त्यांच्या व त्यांच्या कुटूंबातील शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

(9) मातंग समाज आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, विकासाच्या दृष्टीकोनातून मागे राहण्याच्या कारणांवर संशोधन करणे.

(10) मातंग समाजातील व्यक्तिगत माहिती, वैवाहिक स्थिती व कौटुंबिक स्थितीची माहिती मिळविणे व समस्यांची कारणे शोधणे.

(11) नागपूर मध्ये बॅन्ड व्यवसायाचा इतिहास शोधून काढणे.

(12) शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अभ्यास करणे.

(13) सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी शासनाच्या अंतर्गत चालविलेल्या "लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई" या महामंडळाचा आढावा घेणे.

(14) मातंग समाजातील सामाजिक संघटनाचे तसेच बॅन्ड व्यवसायातील संघटनेचे कार्य व योगदान या आधारावर माहितीचे संकलन करणे.

(15) सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी संशोधनाच्या आधारावर शिफारशी करणे व योग्य निष्कर्ष शोधून काढणे.

**नमूना निवड :-**

हया संशोधनाकरिता नागपूर शहरातील 200 मातंग समाजातील उत्तरदात्यांची निवड करण्यात आली.

## संशोधनाची गृहीतकृत्ये (**Research Hypothesis**) :-

"नागपूर शहरातील मातंग समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययनाचा अभ्यास" लक्षात घेता पुढीलप्रमाणे गृहीतकृत्ये प्रस्तुत करण्यात आली आहे.

1) विकासाच्या दृष्टीकोनातून मागासलेली जात आहे. त्यांच्यातील मातंग समाजाचे राहणीमान मागासलेले आहे.

2) अनुसूचित जातीच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्टीकोनातून शासनाने दिलेल्या सोयी व सवलती ह्या महत्त्वाच्या आहेत. परंतू त्यांच्या अशिक्षितपणामुळे त्यांना सोयी सवलतीची जाणीव नाही. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टीकोनातून हे अजूनही मागासलेले आहे.

3) त्यांच्यात अंधश्रद्धा, रुढी परंपरा, धार्मिक बाबी मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळे त्यांच्यात मानसिक, कौटुंबिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

4) अजूनही ग्रामीण भागातल्या स्त्रिया गावकी धंदे, दाईन, झाडू टोपल्याचे काम करतात. अपूऱ्या आर्थिक अडचणीमुळे ते स्वयंरोजगाराचे स्वप्न पाहू शकले नाहीत.

5) सामाजिक व राजकीय दृष्टीकोनातून त्यांच्यात योग्य मार्गदर्शनाचा अभाव असल्यामुळे सामाजिक परिवर्तनाचा ध्यास त्यांना लागलेला नाही.

6) शासनाने सन 1985 ला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ या मातंग समाजासाठी व इतर पोट-जातीसाठी स्थापन करण्यात आले. परंतू ज्यांना आर्थिक मदतीची गरज आहे, तेच या महामंडळापासून वंचीत आहे.

7) मातंग समाजामध्ये दारु व इतर व्यसन ग्रामीण, तालुका व शहरी भागात सारखेच आहे.

8) बॅन्ड कलाकारांची आरोग्य समाधानकारक नसते.

9) बॅन्ड कलाकारांमध्ये कर्जबाजारीपणा मोठया प्रमाणावर दिसून येतो.

10) शासनांच्या विविध योजनांची प्रभावीपणे अमंलबजावणी होत नाही.

**अनूमान :-**

नागपूरमधील मातंग समाजाचे वैयक्तिक व कौटुंबिक उत्पन्न व खर्च लक्षात घेतल्यानंतर असे निदर्शनास आले की, मातंग कलाकाराला बॅन्डचा धंदा पासून व इतर व्यवसायापासून जे काही उत्पन्न मिळत आहे ते फारच कमी आहे. त्यांची आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे त्यांच्या राहणीमानात व परिस्थितीमध्ये कोणताच बदल घडून आलेला दिसत नाही. त्यांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुद्धा काहीच बदल झालेला दिसत नाही. अशा परिस्थितीमुळे त्यांच्या कुटुंबातील शैक्षणिक दजा सुद्धा खालावलेला दिसतो. त्यांची परिस्थिती पाहून सावकार व इतर संस्था सुद्धा कर्ज देण्यात टाळाटाळ करतात. मातंग बॅन्ड कलाकाराची आर्थिक स्थिती खालावलेली असल्यामुळे ते अजूनही दारीद्र रेषेखालीच राहतांना आढळून येते.

## योजनांची आवश्यकता व शासनाने केलेली मदत

मातंग समाजाची आजची परिस्थिती अगोदरच्या परिस्थितीपेक्षा काही प्रमाणात सुधारलेली आढळते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या दुर्बल व दुर्दैवी बांधवांना सहाय्य करण्याची त्याचप्रमाणे त्यांना विकासाची संधी प्राप्त करुन देण्याची जबाबदारी जशी समाजावर पडली तशीच ती शासनावर सुद्धा पडली. ही जबाबदारी हे आपले एक कर्तव्यच आहे असे जाणून शासनाने ती स्वतःवरच घेतली. मागासवर्गीयांच्या विकासासाठी केन्द्र सरकारने व राज्य सरकारने संयुक्तपणे हातभार लावून त्यांच्या धंद्याला प्रोत्साहन देऊन त्यांना विकासाची संधी प्राप्त करुन देणे हे सरकारचे धोरण आहे व त्या दृष्टीने मातंग समाजासाठी शासनाने हातभार लावण्यास प्रयत्न केले आहे व करीत आहे.

ग्रामीण व शहरी भागात मातंग समाजामध्ये अशिक्षित व अज्ञान व्यक्तीचे प्रमाण हे जास्त प्रमाणात असल्यामुळे शासनाने त्यांच्यासाठी राबविलेल्या योजनांचे महत्व त्यांना कळत नाही. आणि म्हणूनच मातंग समाज व बॅन्ड कलाकार हे शासनाच्या योजनेपासून वंचीत राहीलेले आहे असे दिसून येते. ह्या समाजात जे थोडेफार सुशिक्षित व्यक्ती आहेत त्यांना जरुर ह्या योजनाचा फायदा झालेला आहे. अशिक्षित व अज्ञान मातंग व्यक्ती सुद्धा सुशिक्षित व समाज पुढाऱ्यांचे सहाय्य घेऊन योजनांचा लाभ घेण्यासाठी धडपड करीत आहे.

## निष्कर्ष व शिफारशी

संशोधनाकरीता घेतलेल्या "नागपूर मधील मातंग समाजाचे सामाजिक व आर्थिक अध्ययन" ह्या प्रबंधामध्ये सारणीचे विश्लेषण आणि निर्वाचण, सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केलेला आहे. संशोधनकर्त्याने ह्या अभ्यासावरुन पूढील निष्कर्ष काढलेत.

१) ५० टक्के उत्तरदाते २०-३० वयोगटातील आहे. हे सर्वात जास्त आहेत तर ०३ टक्के उत्तरदाते हे ५०-६० वयोगटातील दिसून आहे. ३०-४० वयोगटातील २९ टक्के उत्तरदाते दिसून येतात.

२) अभ्यासाला घेतलेल्या मातंग समाजातील ७१ टक्के उत्तरदाते हे विवाहीत आहेत. २६ टक्के अविवाहीत उत्तरदाते आहेत. तर ०१ टक्का विधूर व ०२ टक्के घटस्फोटीत उत्तरदाते आहेत.

३) एकूण २०० उत्तरदात्यापैकी ९ टक्के उत्तरदाते अशिक्षित असून प्राथमिक, माध्यमिक, एस.एस.सी, एच.एच.सी. पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले उत्तरदाते अनुक्रमे २५ टक्के, २७.५० टक्के, २१ टक्के, १३.५० टक्के, २.५० टक्के, १.५० टक्के असे आहेत. यात सर्वात जास्त उत्तरदाते माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतलेले दिसून येतात. म्हणजेच मातंग समाजात अजुनही शिक्षणाचे प्रमाण कमी दिसून येते.

४) ५९ टक्के उत्तरदाते हे नागपूर शहराचे मुळचे रहीवाशी आहेत व ४१ टक्के उत्तरदाते हे कामधंदयासाठी नागपूरमध्ये वास्तवाला आलेले दिसून येतात.

५) जे बाहेरुन आलेले उत्तरदाते नागपूरला राहात आहेत त्यापैकी ८७.८० टक्के हे आर्थिक कारणामुळे आलेले दिसून येतात. तर १२.२० टक्के उत्तरदाते हे कौटुंबिक कारणामुळे वास्तवाला दिसून येतात. यात ग्रामीण भागात मजुरी बरोबर मिळत नाही. कौटुंबिक कलह, कामधंदा, कुटूंबाचा व्याप मोठा असल्यामुळे ते आलेले दिसून येतात.

६) मातंग समाजाची कौटुंबिक स्थिती बाबत असे दिसून येते की, ६५ टक्के उत्तरदाते संयुक्त कुटूंब पद्धतीने राहतांना दिसून येतात. तर ३५ टक्के उत्तरदाते हे विभक्त पद्धतीने राहतांना दिसतात.

७) वस्तीबाबत मत २४ टक्के उत्तरदात्यांनी स्वच्छ व चांगली वस्ती म्हणून सांगतात, तर ७६ टक्के उत्तरदाते गलीच्छ वस्ती म्हणून सांगतात. यात पाण्याचा अभाव, घाण, ही कारणे सांगतात. हा समाज गरीब असल्यामुळे ते अधिकाधिक उत्तरदाते गलीच्छ वस्तीत राहतांना दिसून येतात.

८) स्वतःच्या मालकीचे घर असलेले उत्तरदाते ६० टक्के असून भाड्याच्या घरात राहणारे ४० टक्के उत्तरदाते आहेत. कामधंदयाच्या कारणामुळे हे उत्तरदाते भाड्ने राहतात. आर्थिक टंचाईमुळे ते स्वतःचे घर तयार करु शकले नाहीत.

९) मातंग उत्तरदात्याला पैशाची अडच्ण भासली तर ते ५२ टक्के उत्तरदाते सावकाराकडून जास्तीतजास्त संख्येने कर्ज घेतात. याचा व्याजाचा दर १२ टक्के ते १५ टक्के असल्यामुळे त्यांना गरीबीतच जिवन जगावे लागते.

१०) मातंग समाजातील ७२ टक्के उत्तरदाते मातीच्या घरात तर १८ टक्के लोक अजुनही कुडाच्या झोपड्यात राहतांना दिसून येते. फक्त १० टक्के उत्तरदाते जे खाजगी व सरकारी नौकरीवर आहेत तेच सिमेंटच्या घरात राहतांना दिसून येतात. आर्थिक अडचणीमुळे स्वतःचे चांगले घर तयार करु शकले नाहीत. ७२ टक्के उत्तरदात्यांना कुटूंबाकरीता घर राहण्याकरीता पुरेसे वाटत नाही.

११) कुटूंबाच्या शिक्षणाचा अभ्यास केला तर प्रायमरी पय्रंत ३४.८४ टक्के विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर पदवी १.६४ टक्के पदव्युत्तर ०.६१ टक्के विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आर्थिक अडचणीमुळे उत्तरदाते आपल्या मुलांना एच.एस.सी च्यापुढे शिकऊ शकले नाहीत. परंतु तरुणपिढी आपल्या मुलांना शिकविण्याच्या तयारीत दिसून येतात.

१२) शिक्षण घेतलेल्या १२३ उत्तरदात्यापैकी आर्थिक कारणामुळे शिक्षण न घेतलेले ८४.५५ टक्के, शिक्षणाची इच्छा नसलेले १२.२० टक्के, तर गावात शाळा नव्हती असे सांगणारे ३.२५ टक्के उत्तरदाते दिसून येतात. महत्वाचे आर्थिक कारण दिसून येते. पारंपारीक धंदयामुळे त्यांच्या राहणीमानाबद्दल दिसून येत नाही. आर्थिक अडचणीमुळे शिक्षण घेवू शकले नाही.

१३) मातंग समाजाचा मुख्य व्यवसाय बॅन्ड वाजविणे आहे. त्याचबरोबर रिकाम्या वेळात रिक्षा चालविणे, ॲल्युमिनीयमचे भांडे विकणे असा जोडधंदा आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिमाण दिसून येतो. १५ टक्के उत्तरदात्याची आरोग्य उत्तम असे दिसून येते. तर ३५ टक्के उत्तरदात्याचे सर्वसाधाण प्रकृती दिसून येते व असमाधानकारक ५० टक्के उत्तरदात्याची प्रकृती दिसून येते. बॅन्ड वाजविल्यामुळे प्रकृतीवर परिमाण होतो. त्याचप्रमाणे रिक्षा चालविणे, ॲल्युमिनियमची भांड्याच्या व्यवसायामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होतांना दिसून येते. कमी मजुरीमुळे ते प्रकृतीवर योग्य उपाय करु शकत नाही.

१४) त्यांच्या सवयीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, या समाजात दारु पिण्याचे प्रमाण ८२ टक्के सट्टा खेळण्याचे ५५ टक्के व गांजा व चरण पिण्याचे प्रमाण ४० टक्के दिसून येते. यावरुन असे स्पष्ट होते की, या समाजात दारु पिण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे सुद्धा त्यांचा विकास होऊ शकला नाही.

१५) अभ्यासाला घेतलेल्या २०० उत्तरदात्यापैकी ९१ टक्के उत्तरदाते हे बॅनड व्यवसायात गुंतलेले दिसून येतात. जे उत्तरदाते थोडेफार शिकलेले आहे, त्यातील ६.५ टक्के खाजगी नौकरी करतात, तर २.५ टक्के उत्तरदाते सरकारी नोकरीवर आहे. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे ते पारंपारिक धंदा म्हणजे बॅन्ड वाजवितांना अधिक प्रमाणात दिसून येतात.

१६) १८२ उत्तरदात्यांपैकी जोडधंदा म्हणून झाडू / टोपले तयार करणारे, ३९.५६ टक्के ॲल्युमिनियमची भांडी विकणारे ३०.२२ टक्के, २६.९२१ टक्के रिक्षा चालविणारे तर ३.३० टक्के उत्तरदाते जोडधंदा न करणारे दिसून येतात.

१७) व्यवसाय प्रमुखाशी चांगले संबंध असणारे ४४ टक्के साधारण संबंध असणारे ५४ टक्के तर वाईट संबंध असणारे २ टक्के उत्तरादाते दिसून येतात. बॅन्ड व्यवसायात भितीपोटी चांगले संबंध आहेत असे सांगितलेले आहेत.

१८) मातंग कुटूंबाचे एकूण मासिक उत्पन्नाचे अध्ययन करता असे दिसून येते की, रु.३५०० ते ४५०० मिळविणारे ५४.५ टक्के, ४५०० ते ५५०० उत्पन मिळविणो ३९.५ टक्के, ५५०० ते ६५०० उत्पन्न मिळविणारे ०४ टक्के तर ६५०० व पुढे उत्पन्न मिळविणारे ०२ टक्के उत्तरदाते आहे. सर्वात जास्त ५४.५ टक्के हे ३५०० ते ४५०० उत्पन्न मिळविणारे दिसून येतात.

त्यांच्या खर्चाच्या तपशीलावरुन असे दिसून येते की, ४००० ते ५००० खर्च करणारे उत्तरदाते ४१.५ टक्के ५००० ते ६००० खर्च करणारे ४७.५ टक्के, ६००० ते ७००० खर्च करणारे ९ टक्के तर ७००० च्या पुढे खर्च करणारे २ टक्के उत्तरदाते दिसून येतात.

यावरुन असे निदर्शनास येते की, उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झालेला दिसून येतो. अतिरिक्त भांडवल किंवा सावकाराकडून व्याजाने घेतांना दिसून येतात व बॅन्ड वाजविण्याकरीता असलेल्या बॅन्ड प्रमुखाकडून पूढील वर्षाकरीता जोडावर घेतांना दिसून येते.

१९) २०० उत्तरदात्यापैकी २१.५ टक्के उत्तरदाते बचत करतांना दिसून येते, तर ७८.५ टक्के उत्तरदाते हे बचत करीत नाहीत. जे उत्तरदाते नौकरीवर आहेत तसेच जे उत्तरदाते मोठ्या बॅन्डमध्ये वाजवितात ते बचत करतांना दिसून येते.

२०) मातंग समाजात अशिक्षितांचे किंवा कमी शिकलेल्या उत्तरदात्याचे प्रमाण अधिक असल्यामुळे त्यांच्यासाठी शासनाने राबविलेल्या योजनांची माहिती त्यांना मिळत नाही व त्यांना समाजापूढाऱ्याकडून, कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून योग्य मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे या सर्व योजना पासून ते वंचित असलेले दिसून येते.

**शि फा र शी :-**

१) मातंग समाज दारीद्र्यात, पारंपारिक व्यवसायात न राहता आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारावी व राहणीमानाचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करावा, घरातील स्वच्छता, घरासभोवतालची साफसफाइर, कुटूंबातील सभासदांची व स्वतःची प्रकृतीची काळजी घ्यावयास पाहीजे. दारु पिणे, जुगार, सट्टा, गांजा, चरस इत्यादी वाईट सवयी बंद केल्या पाहिजेत. त्यामुळे आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारेल.

२) मातंग समाजाला शासनाच्या योजनांचा लाभ झालेला नाही. त्याकरीता योग्य नेतृत्वाची गरज त्यांना आहे. सक्षम संघटन तयार करुन सुशिक्षित व्यक्तीकडून या योजना संबंधीची माहिती कॅडर कॅम्पच्या माध्यमातून द्यावी.

३) त्यांना परीवर्तनवादी विचार सांगून अंधश्रद्धा, रुढी, परंपरा सोडविण्यास सांगणे, त्यांचे चर्चासत्र घेणे व त्यातून नवीन विचार सांगितल्यानुसार त्यांच्यात आर्थिक, सामाजिक, राजकीय विचार प्रगल्भ होतील.

४) शासनाने बॅन्ड वाजविण्याकरीता कल्याणकारी योजना राबवून त्यांचा विकास घडवून आणला पाहीजे. आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी पूढील शिफारशी केलेल्या आहेत.

अ) मातंग समाजातील मुले अशिक्षित न राहता व पूढील शिक्षण घेण्याकरीता शासनाने मातंग समाजाला शैक्षणिक दृष्टीकोनातून विनामुल्य सवलती प्राप्त करुन द्याव्यात.

ब) मातंग समाजाकरीता "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळामार्फत गरजू व्यक्तीस कर्जाची सोय उपलब्ध करुन द्यावी, त्यामुळे त्यांच्या व्यवसायाला चालणा मिळेल. त्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारुन त्यांच्या राहणीमानात सुधारणा होईल.

क) मातंग समाजाचा अभ्यास करण्याकरीता तो क्रांतीवीर लहूजी साळवे आयोग २००३ ला स्थापन करण्यात आला होता. तो अभ्यास आयोग नव्याने सुरु करण्यात यावा व त्यानुसार शासनाने समाज सुधारण्याकरीता आयोगाने दिलेल्या शिफारशी पूर्ण कराव्यात.

ड) बॅन्ड कलाकाराची बॅन्ड व्यवसायात पिळवणूक होवू नये म्हणून "जे चालक तेच मालक" या पद्धीवर बॅन्ड व्यवसाय सुरु करावा.

इ) बॅन्ड व्यवसाय मातंग समाजाचा प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्हा पातळीवर "बॅन्ड प्रशिक्षण केन्द्र" उघडण्यात यावे.

ई) शासनाने दारीद्र रेषेखाली असलेल्या मातंग समाजाला मोफर घे बांधून द्यावीत. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याची सोय, स्नानगृहे इत्यादीची सोय करुन द्यावी.

उ) मातंग समाजातील अधिकाअधिक व्यक्ती बॅन्ड व्यवसायात आहेत. त्यांना डब्ल्यु.सी.एल. व पोलीस बॅन्डमध्ये सरळ भर्ती करावी.

वरीलप्रमाणे शिफारशींचे शासनातर्फे परिपूर्ण पालन झाल्यास माझ्यामते मातंग समाजाच्या बॅन्ड कलाकारांच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय इ. क्षेत्रात बदल होईल व इतर समाजाप्रमाणे त्यांचासुद्धा विकास होवून त्यांना मान-सन्मान प्राप्त होईल.